वाचले:-१) अर्जदार मुख्याधिकारी, नगरपरिषद जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.बांध/वशी/१५६४/१८-१९, दि-२२/१०/२०१८ अन्वये तहसिलदार जुन्नर यांचे कार्यालयाकडे केलेला अर्ज.

२) तहसिलदार जुन्नर यांचेकडील पत्र जमीन/कावि/२०१२/२०१८, दिनांक-२६/१०/२०१८ रोजीचा चौकशी अहवाल.

३) उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१२५६/२०१८, दिनांक-३०/१०/२०१८ रोजीचा चौकशी अहवाल.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२१३/ज-१, दिनांक-१९ सप्टेंबर २०१६.

५) शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक, क्र. जमीन/१०९१/७१३/प्र.क्र.५९/ज-१, दिनांक-१४/१२/१९९८.

६) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमअ-१/सीआर/३५/२०१८, दिनांक-०९/०१/२०१९

---

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**
(महसूल शाखा)
क्र. पमअ-१/सीआर/०१/२०१९
पुणे-१. दिनांक:- ०१/०३/२०१९

जिल्हाधिकारी पुणे सत्यमेव जयते

विषय:-जमीन-पुणे

मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सरकारी जमीन गट क्र. ११/१ (सि.स.नं. ५११९) मधील ०० हे. ५४ आर क्षेत्र केंद्र शासनाच्या ***"प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे २०२२"*** या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना परवडणारी घरेबांधण्यासाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद जुन्नर, ता. जुन्नर यांना देण्याबाबत...

आदेश,

ज्याअर्थी, **शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२१३/ज-१ दिनांक १९ सप्टेंबर २०१६ मधील** तरतुदीनुसार केंद्र शासनाच्या ***"प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे-२०२२"*** या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना परवडणारी घरे बांधण्यासाठी मिळणेबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद जुन्नर, ता. जुन्नर यांनी **पत्र क्र. बांध/वशी/१५६४/१८-१९, दिनांक-२२/१०/२०१८** अन्वये **तहसिलदार जुन्नर** यांचे कार्यालयाकडे अर्जकरून **जुन्नर नगरपरिषद, जुन्नर** यांचे विकास आराखडयामधील **मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील गायरान जमीन गट क्र. ११/१ (सि.स.नं. ५११९)** मधील **०० हे. ५४** आर क्षेत्र मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

२. ज्याअर्थी, प्रस्तुत जागा मागणीचे अनुषंगाने तहसिलदार जुन्नर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/२०१२/२०१८,दिनांक-२६/१०/२०१८ अन्वये चौकशी अहवाल उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवालाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१२५६/२०१८, दि-३०/१०/२०१८

अन्वये चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केला असून विषयांकित जमिन वाटपास हरकत नसलेचे नमूद केले आहे.

३. ज्याअर्थी, नमुद मिळकतीबाबत प्रकरणी समाविष्ठ सन-२०१३-१४ ते २०१५-१६ या कालावधीमधील ७/१२ पाहता, एकुण क्षेत्र ०४ हे. ८७.९२ आर इतके असुन कब्जेदार सदरी ग्रामपंचायत पाडळी मुक्त सरकार गायरान क्षेत्र-०४ हे. २३.९७ आर, कृषि आयुक्त महराष्ट्र राज्य कृषि विभाग यांचेवतीने उपविभागीय कृषिअधिकारी प्रशिक्षण भेट योजना राजगुरूनगर क्षेत्र-०० हे. १५ आर, मुख्याधिकारी गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ पुणे आगरकर नगर क्षेत्र-०० हे. ४८.९५ आर इतके असुन **इतर हक्कामध्ये जुन्नर नगरपरिषद गृहबांधणी योजनेसाठी राखीव क्षेत्र ०४ हे. ३५ आर**, स.नं. ९ पैकी रस्त्याचे दोन्ही बाजूस १ आणे ८८ पै. क्षेत्र १/७६० वार्ड झाडे लावणेकामी, तलाठी कार्यालय व निवास बांधकाम तसेच मंडलाधिकारी कार्यालयासाठी राखीव क्षेत्र-०० हे. ०५ आर असा शेरा नमुद आहे.

४. ज्याअर्थी, मुख्याधिकारी, जुन्नर नगर परिषद, जुन्नर यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. बांध/वशी/१७९३/२०१८, दिनांक-२२/११/२०१८ अन्वये सदर जागेवर अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टी आहे त्या ठिकाणी मा. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत **घटक क्र.१** मध्ये जमिनी चा साधन संपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्टयांचा आहे तिथेच विकास करणे चा प्रस्ताव नगर परिषदेचा आहे. तसेच तेथे असलेले पुरातन मारूती मंदीर आहे ते तसेच ठेवणेत येईल असे कळविले आहे.

तसेच गाव कामगार तलाठी यांनी दिलेल्या दिनांक-१५/११/२०१८ च्या अहवालाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर ०४ हे. २३.९७ आर क्षेत्र शिल्लक आहे. त्यापैकी नगर परिषद सुधारित विकास आराखडा-२ प्रमाणे आरक्षण क्र. ६३ Wristing Area & Fire Ground Area करीता ६०७०.०० चौ.मी. आरक्षित आहे व आरक्षण क्र. ६४-Municipal Purpose करीता ३७२०.०० चौ.मी. क्षेत्र आरक्षित आहे. तसेच नगर परिषदेने झोपडपट्टी ज्या जागेवर आहे. त्या ठिकाणी विकास करणेकरीता **० हे. ५४ आर** क्षेत्राची मागणी केलेली असून **सदर गृहप्रकल्प हा ७/१२ वरील इतर हक्कातील नगर परिषदेस गृह बांधणी योजनेसाठी राखीव ०४ हे. ३५ आर क्षेत्रामध्येच उभारणार असलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.**

५. ज्याअर्थी, **शासन निर्णय क्र. जमिन-२०१६/प्र.क्र.२१३/ ज-१, दिनांक १९ सप्टेंबर २०१६ मधील तरतुदीनुसार मुख्याधिकारी जुन्नर नगरपरिषद जुन्नर यांनी सदर जागेची मागणी केलेली आहे. तसेच मागणी केलेली जमिन ही गायरान संवर्गातील असून जुन्नर नगरपरिषद, जुन्नर यांचे हद्दीमध्ये समाविष्ठ आहे.**

६. ज्याअर्थी, शासन परिपत्रक क्र. जमिन/१०९१/७१३/प्र.क्र.५९/ज-१, दिनांक-१४/१२/१९९८ मधील तरतुदीनुसार या कार्यालयाकडील आदेश क्र. पमअ-१/सीआर/३५/२०१८, दिनांक-०९/०१/२०१९ अन्वये विषयांकित जमिनीचे अधिकार अभिलेखाचे इतर हक्कातील नगर परिषदेस गृह बांधणी योजनेसाठी **राखीव ०४ हे. ३५ आर** क्षेत्रापैकी **०० हे. ५४ आर** क्षेत्राचा गायरान दर्जा कमी करून सरकार अशी नोंद गाव दप्तरी अभिलेखामध्ये **फेरफार क्र. १९६५** अन्वये घेणेत आलेली आहे.

७. ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/ प्र.क्र.२१३/ज-१, दिनांक-१९ सप्टेंबर २०१६** मधील तरतुदीनुसार मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता. जुन्नर यांनी मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील जमीन ग.नं. ११/१ पै. (सि.स.नं. ५११९) ०० हे. ५४ आर (५४००.००चौ.मी.) क्षेत्राकरीता कब्जेहक्काची र. रू. ५४००/- इतकी शासन जमा करुन त्याबाबत चलन **क्र. एम. एच. ००९६२४१०९ २०१८१९, दिनांक-२०/१२/२०१८ एम** ची प्रत या कार्यालयास सादर केलेली आहे.

त्याअर्थी, मी **नवल किशोर राम, जिल्हाधिकारी पुणे** महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम-१९६६ चे कलम ४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट नियम १९७१) नियम-५ व महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२१३/ ज-१ दिनांक-१९ सप्टेंबर २०१६ मधील नमुद तरतुदीनुसार **मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील सरकारी जमीन गट क्र. ११/१ पै. (सि.स.नं. ५११९) ०० हे. ५४** आर क्षेत्र **मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद जुन्नर, ता. जुन्नर** यांना ***"प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे-२०२२"*** या योजनेसाठी खालील अटी व शर्तीवर कब्जेहक्काने प्रदान करण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती-</u>

१) विषयांकीत मंजूर करण्यात आलेली जमीन मुख्याधिकारी, जुन्नर, नगरपरिषद जुन्नर, ता. जुन्नर हे **भोगवटादार वर्ग-२** म्हणुन धारण करतील.

२) प्रस्तुत कामी दिनांक-१९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील **अट क्र. ३** नुसार सदर जमिनीचा मंजूर प्रयोजनासाठी विकास झाल्यानंतर त्यावरील सदनिका धारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे उक्त जमीन रु.१/- या नामामत्र वार्षिक भुईभाडयाने एकावेळी ३० वर्षापेक्षा जास्त होणार नाही अशा कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर यांना राहतील. संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्था जिल्हाधिकारी यांचे पूर्वपरवानगी शिवाय उक्त जमीन हस्तांतरीत करणार नाही अथवा गहाण/तारण/हस्तांतरण करणार नाही. आणि अशा प्रस्तावित हस्तांतरणावर शासनाच्या महसूल व वन विभागाच्या प्रचलित आदेशातील तदतुदीनुसार अर्नजित उत्पन्नाचा हिस्सा वसूल केल्याखेरीज अशा जमिनीच्या कोणत्याही हस्तांतरण प्रस्तावास मान्यता देता येणार नाही. त्याचप्रमाणे अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्याकडून होणाऱ्या त्यांच्या सदनिकेया हस्तांतरणापोटी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण शुल्क शासन जमा करणे अनिवार्य राहील. तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्यास जिल्हाधिकाऱ्यांच्या अथवा शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वानुमतीशिवाय त्याची सदनिका गहाण ठेवता येणार नाही.

३) सदर केंद्र पुरस्कृत *"प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे-२०२२"* या योजनेनुसार शासन निर्णय क्र. प्रआयो/२०१५/ प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल) दि.०९/१२/२०१५ मधील घटक क्र. १ नुसार झोपडयांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी (सु. नि. व पु.) अधिनियम,१९७१ मधील तरतुदीनुसार उक्त जागेतील अस्तित्वातील अतिक्रमण धारकांचे लाभार्थी म्हणून पात्रता तपासणेची जबाबदारी मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर यांची राहील.

४) सदर ठिकाणी प्रकल्प मंजूरीकामी सनियंत्रण समिती यांची आवश्यक ती मंजूरी घेण्याची जबाबदारी नागरी स्वराज्य संस्था म्हणून मुख्याधिकारी, जुन्नर नगर परिषद, जुन्नर यांची राहील.

५) उक्त जमीनीचा ताबा घेतल्यानंतर **दोन वर्षाचे आत** दिलेल्या प्रयोजनासाठी जागेचा वापर सुरु करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

६) सदर जागेवर पर्यावरणाच्या पुनर्स्थापनेसाठी व पर्यावरण संतुलन कायम राखण्याच्या दृष्टीने विषयांकित जागेत आवश्यक तेथे वृक्ष लागवड करणे व त्यांची जोपासणा करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

७) विषयांकीत जागेबाबत शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दिनांक-३१ ऑक्टोबर-२००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम-१९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

८) प्रतिग्रहीता यांनी उक्त जमीन ताब्यात घेतल्यानंतर नमुना-१८ प्रमाणे जागेस नावाचा बोर्ड लावण्यात यावा.

९) प्रस्तुत जमिनीचा ताबा घेताना प्रतिग्रहीता यांनी विहीत नमुन्यातील सनद करुन घ्यावी.

१०) प्रस्तुत जागेतून लघु अथवा उच्च दाबाची विद्युतवाहिनी जात नसलेबाबतची खात्री करणेची सर्वस्वी जबाबदारी प्रतिग्रहिता यांची राहील.

११)प्रस्तुत आदेशातील वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत **रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र** सदर क्षेत्राचा ताबा घेण्यापूर्वी तहसिलदार जुन्नर यांच्याकडे सादर प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

१२) प्रतिग्रहित्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा होण्यास पात्र राहील.

सही/-XXX

**(नवल किशोर राम)**
**जिल्हाधिकारी पुणे**

**प्रति,**

**मुख्याधिकारी, जुन्नर नगर परिषद, जुन्नर**

**प्रत:- १) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे -०१** यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
**२) उपविभागीय अधिकारी, खेड** यांना माहितीसाठी रवाना.
**३) तहसिलदार जुन्नर**

२/- प्रस्तुत आदेशातील **अट क्र. ११** मध्ये सूचित केल्याप्रमाणे उक्त जमिनीचा ताबा देणेपुर्वी आदेशातील वरील नमूद सर्व अटी मान्य असलेबाबत प्रतिग्रहिता मुख्याधिकारी, जुन्नर नगर परिषद यांचेकडून प्रथमत: घेणेत यावे व तद्नंतर मौजे पाडळी, ता. जुन्नर जि. पुणे येथील सरकारी जमिन गट नं. ११/१ पै. (सि.स.नं. ५११९) ०० हे. ५४ आर क्षेत्राचा ताबा प्रतिग्रहिता यांस देवून योग्य नोंदी गावचे दप्तरी घेऊन दुरूस्त ७/१२, जागेचा पंचनामा, ताबे पावती, जागेचा नकाशा यासह पुर्तता अहवाल सादर करावा. तसेच आदेशातील अट क्र. १ प्रमाणे ७/१२ सदरी योग्य त्या नोंदी घेणेस सूचित करावे. सोबत मुळ संचिका **पृ.क्र. १ ते ८७** असत.

४) **गाव कामगार तलाठी पाडळी,** ता. जुन्नर, जि. पुणे
५) **राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र** जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११००१ यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

(विवेक जाधव)
तहसिलदार महसुल